


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ११३ ● पुणे ● गुरुवार, दि. १३ मार्च २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



३८ हजार गरजू रुग्णांना मोफत डायलिसिसचा लाभ 3



बाजारपेठ लवकरच कायमस्वरूपी वाहनमुक्त 4

## सुट्टीची सुचना

आज गुरुवार, दि. १३ मार्च २०२५ रोजी **होळी निमित्त** **दै. आरंभ पर्व** कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या शुक्रवार, दि. १४ मार्च २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

*-संपादिका*

# संपादिका सुरेखा मते यांना 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पत्रकारितेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'आरंभ पर्व' या वृत्तपत्राच्या संपादिका सुरेखा मते यांना प्रतिष्ठित 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. युवा महाराष्ट्र फाऊंडेशनच्या वतीने विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्कार वितरण समारंभ पं. जवाहरलाल नेहरू सभागृह, घुले रोड, शिवाजीनगर, पुणे येथे मोठ्या दिमाखात पार पडला. या सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकार, साहित्यिक, समाजसेवक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विशेष पाहुण्या म्हणून अभिनेत्री किआरा जाधव, हसिनी सुधीर, आमायरा गोस्वामी आणि रुपाली कदम यांनी हजेरी लावली.

सुरेखा मते यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रामाणिक आणि निर्भीड दृष्टिकोन ठेवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'आरंभ पर्व' या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. सत्य आणि लोकशाही मूल्यांवर आधारित पत्रकारितेसाठी त्या ओळखल्या जातात. त्यांच्या निर्भीड लिखाणामुळे त्या वाचकप्रिय संपादिका ठरल्या आहेत.

पुरस्कार स्वीकारताना सुरेखा मते म्हणाल्या, "हा पुरस्कार केवळ माझा नाही, तर संपूर्ण पत्रकारिता क्षेत्राचा सन्मान आहे. सत्य आणि निर्भीड पत्रकारिता करणे हेच माझे ध्येय राहिले आहे. समाजहितासाठी मी यापुढेही कार्यरत राहीन."

संपादक म्हणून केवळ वृत्तपत्र चालवणे नव्हे, तर समाजात सकारात्मक बदल घडवणे हेच आपले उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्त्री सबलीकरण, ग्रामीण विकास, शिक्षण, पर्यावरण आणि भ्रष्टाचारविरोधी लढा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी प्रभावीपणे लेखन केले आहे.

### पत्रकारिता क्षेत्रातील सन्माननीय योगदान

**सुरेखा मते यांच्या परखड आणि तटस्थ पत्रकारितेमुळेच त्यांना 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या सन्मानामुळे संपूर्ण पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, सामाजिक न्याय आणि सत्यासाठी झगडणाऱ्या पत्रकारांसाठी हा एक प्रेरणादायी क्षण ठरला आहे.**

## ठळक बातम्या

### मामाचा काटा काढण्यासाठी मामीकडून जादूटोणा?

पुणे (आरंभ पर्व): आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश तात्याबा वाघ यांच्या हत्येमागे वाघ यांची पत्नीच असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे पोलिसांनी टिळेकर यांच्या मामीला म्हणजे सतीश वाघ यांच्या पत्नीला अटक केली आहे. या प्रकरणी आता एक मोठी अपडेट आली आहे. पोलिसांनी या प्रकरणाची चार्जशीट दाखल केली आहे. यात सतीश वाघ यांच्यावर जादूटोणा करण्याचा प्रयत्न झाल्याचंही स्पष्ट झालं आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश तात्याबा वाघ (वय 58, रा. फुरसुंगी, सासवड रस्ता) यांच्या खुनाचा मुख्य सूत्रधार हा अक्षय जावळकर आहे. या खुनासाठी त्याला मोहिनी वाघनेच भरीस घातल्याचं पोलिसांच्या तपासात पुढे आले आहे. अक्षय आणि मोहिनी या दोघांनीही सतीश यांचा काटा काढण्यासाठी जादूटोण्याचा प्रयोग केल्याचा धक्कादायक प्रकार आरोपपत्रातून समोर आला आहे. लष्कर न्यायालयात नुकतेच एक हजार पानांचे दोषारोपपत्र गुन्हे शाखेकडून दाखल करण्यात आले. त्यात या प्रकाराचा उल्लेख करण्यात आल्याचं सूत्रांनी सांगितलं.

### खोक्याचे पॅकअप

बीड (आरंभ पर्व): बीड जिल्ह्यात दहशत माजवणारा सतीश ऊर्फ खोक्या भोसले याच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. तो प्रयागराजच्या दिशेने सटकल्याचे तपासात समोर आले होते. त्यानंतर बीड पोलिसांनी तपासाची वेगानं चक्र फिरवली. खोक्याला प्रयागराज येथे उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने पकडण्यात आले. बीड पोलिसांनी त्याचा ताबा मिळवला आहे. त्याला लवकरच बीडमध्ये आणण्यात येणार आहे. त्याला विमानाने छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर आणण्याची शक्यता आहे. त्यानंतर त्याला बीडला नेण्यात येईल. खोक्या भोसले याला प्रयागराज न्यायालयात हजर करण्यात येईल. ट्रान्झिट रिमांडनंतर त्याला बीडला आणण्यात येईल. त्याला विमानाने छत्रपती संभाजीनगर येथे आणण्यात येईल, अशी शक्यता आहे. त्यानंतर संध्याकाळपर्यंत त्याला बीडमध्ये नेण्यात येईल. त्यानंतर त्याला विविध गुन्ह्यात कोर्टासमोर हजर करण्यात येईल. त्याचे तीन ते चार व्हिडिओ व्हायरल झाले आहे. त्याआधारे त्याच्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर दुसरीकडे वन्यप्राणी कायद्यांतर्गत सुद्धा त्याच्यावर कारवाई होईल. खोक्याचे व्हिडिओ समोर आल्यानंतर त्याने प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्याची बाजू मांडली.

# पुण्यातील भोंग्यांचं होणार सर्वेक्षण!

## पोलिस आयुक्तांची बैठक, शहरात १८३० भोंगे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरामध्ये सर्वधर्मीय धार्मिक स्थळांवर १८३० भोंगे असल्याची नोंद पोलिस प्रशासनाकडे आहे. या भोंग्यांचं सर्वेक्षण होणार असून अनधिकृत भोंग्यांची माहिती घेण्याचे आदेश पोलिस आयुक्तांनी ठाण्यांना दिलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आदेशाचं पालन करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने वेगवेगळ्या धार्मिक स्थळांवर असलेल्या भोंग्याबाबत ध्वनी प्रदूषण मर्यादित ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या नियमाचे पालन करण्याचे आदेश दिले आहे.



राज्य शासनाच्या आदेशानुसार दिवसा 55 डेसिबल तर संध्याकाळी 45 डेसिबल आवाजाची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. त्यासोबत या आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी पुण्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांची बैठक घेतली.

बैठकीमध्ये पोलिस आयुक्तांनी आपापल्या हद्दीतील सर्वधर्मीय प्रार्थना स्थळांवरील अधिकृत आणि अनधिकृत भोंग्यांची माहिती घेण्यास सांगितलेले आहे. पोलिसांच्या अहवालानुसार सध्या पुणे शहरांमध्ये 1830 भोंगे विविध प्रार्थना स्थळांवर आहेत.

पुणे शहरामध्ये सर्वसाधारण 1000 मंदिरे आहेत. तर 130 चर्च, 200 बौद्ध विहार, 300 मशिदी, 150 दर्गा आणि 50 मदरसे. या ठिकाणी भोंगे असल्याचे रेकॉर्ड पोलिसांकडे आहे. तसेच रात्री दहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत भोंगे बंद ठेवले जाणार आहेत.











# महाकुंभ म्हणजे समरसतेचा परिचय!

प्रयागराजमध्ये गेल्या महिन्यात त्रिवेणी संगमामध्ये ४५ दिवसांच्या महाकुंभात सुमारे ६५ कोटी भाविकांनी आस्थेची डुबकी मारली आणि ही सर्व भाविक मंडळी फार भाग्यशाली ठरली आहे. पौष पोर्णिमा ते महाशिवरात्री असा ४५ दिवसपर्यंत चाललेला महाकुंभ १४४ वर्षांनंतर होत असल्याने याचे फार मोठे अनन्य महत्त्व होते आणि या शताब्दीमधील आतापर्यंतची ही सर्वात महत्त्वपूर्ण अविस्मरणीय आणि अकल्पनीय अशी घटना मानली जाईल. त्रिवेणी संगमाच्या काठावर जमलेला अथांग विशाल जनसागर पाहताच मन एकदम भरून येत असे आणि सहजपणे मनात प्रश्न निर्माण होतो की हे काय सुरू आहे? खरोखरच विराट भाविकांचा हा जनसागर म्हणजे जणू भारत देशाला सामाजिक समरसता आणि सांस्कृतिक एकताच्या युग परिवर्तनाचा संकेत मिळाला आहे तसेच महाकुंभच्या माध्यमातून आमची प्राचीन सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा अधिक सुदृढ व समृद्ध झाली आहे तर दुसरीकडे देशाची विशेषतः उत्तर प्रदेशची अर्थव्यववस्था आणि विकास दर चांगला वेगाने मजबूत होणार आणि लोकांचे जीवनमान चांगल्याप्रकारे सुधारेल असा विश्वास प्रमुख अर्थवेत्त्यांनी व्यक्त केला आहे. याद्दष्टीने देखील महाकुंभाचे महत्त्व अनन्यसाधारण वाढले आहे. न भूतो न भविष्यती असे वर्णन महाकुंभाचे करता येईल इतके विराट, विशाल असे स्वरुप होते.

महाकुंभ हे काही धार्मिक आयोजन नव्हते तर यामुळे सामाजिक समरसता, सांस्कृतिक और आध्यात्मिक एकता प्रतिष्ठापित झाली आहे तसेच आज समाजामध्ये जातीपातीमध्ये भेदभाव, तणाव, परस्पर विरोध, भांडण, आणि संभ्रम पसरविण्याचा सुनियोजित असा प्रचार प्रसार विरोधी पक्षांकडून सारखा केला जात आहे, त्यास या महाकुंभामध्ये कोट्यवधी भाविकांनी संगमामध्ये डुबकी मारुन चोख उत्तर दिले आहे आणि विरोधकांच्या प्रचारांकडे दुर्लक्ष केले आहे. संगमामध्ये डुबकी मारताना आपले शेजारी कोण उभा आहे हे कोणास माहीत देखील नव्हते आणि कोणी कुणाला तसे विचारले देखील नाही. आपण कोविड महामारीच्या काळांत



संपूर्ण देशभरांत लॉकडाउन असल्याने कोणी कुठे बाहेर जाऊ शकत नव्हता, माणसा माणसामधील संबंध दुरावले होते; परंतु या महाकुंभाचे वेळी प्रयागराजमध्ये त्रिवेणी संगमामध्ये आस्थेची डुबकी मारतांना दुरावलेली माणसे जोडली गेल्याचे पाहावयास मिळाले आणि अशाप्रकारे सामाजिक समरसतेचा परिचय अनुभवला आणि प्रत्यय आला.

महाकुंभाचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल की, यामध्ये सर्व समाजातील अगदी तळागळातील, विभिन्न जाती, धर्म, संप्रदाय, भाषा, विविध चालीरिती मानणारे अथवा नाही मानणारे देखील असे सर्वजण सामिल झाले होते आणि प्रामुख्याने उल्लेखीय असे की, यापूर्वी कधी दक्षिणेकडील तमिलनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक शिवाय पूर्वोत्तर राज्य आसाम, मेघालय, मिजोरम, त्रिपुरा आदी राज्यांतील सनातनी भाविक मोठ्या संख्येने कुंभामध्ये डुबकी मारायला आले होते. तसेच औद्यागिक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख उद्योगपती आपल्या कुटुंबीयांसमवेत हजेरी लावून गेलेत. सुमारे चार हेक्टर कुंभमेळा क्षेत्र परिसरांत संपन्न झालेल्या या संपूर्ण सोहळ्याचे आयोजन, नियोजनाचे श्रेय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि मार्गदर्शनामध्ये एकूण सर्व प्रकारची व्यवस्था मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आपल्या सरकारांतील सर्व सहकारी मंत्री, अधिकाऱ्यांना आपल्या सोबत घेऊन चालण्याची विशिष्ट कार्यशैली आणि सामूहिक कर्तव्य भावनेला ही जाते. महाकुंभामध्ये सुमारे पन्नास देशांचे राजदूत व उच्चायुक्तही आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे कथन अगदी तंतोतंत खरे आणि वस्तुस्थिति दर्शविणारे आहे की, प्रयागराजच्या पवित्र भूमीवर महाकुंभ यशस्वीपणे संपन्न झाला. देशाची जाणीव जागृत होते आणि ती गुलामी मानसिकतेच्या जोखडातून मुक्त होते, तेव्हा ती नव्या ऊर्जेने भारलेल्या ताज्या हवेत मोकळा श्वास घेते. याचाच परिणाम प्रयागराज येथे १३ जानेवारीपासून सुरु झालेल्या एकता का महाकुंभ म्हणजेच एकतेच्या महाकुंममध्ये पाहायला मिळाला. मोदी पुढे म्हणतात की, गेल्या वर्षी २२ जानेवारी २०२४ अयोध्यामध्ये रामंदिराच्या प्राणप्रतिष्ठे वेळी मी देवभक्ती आणि देशभक्ती बाबत विचार व्यक्त केले होते. देशात जागृत झालेल्या जाणिवेचे दर्शन अर्थात साक्षात्कार यावेळी घडला असे मोदी यांनी म्हटले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या भारत देशांत परकीय आक्रमणकारी शक्तीनी आपल्या येथील जनसामान्यांना हरप्रकारे नामोहरण, अन्याय, अत्याचार, आपल्या सांस्कृतिक मान्यता, परंपरा, देवीदेवता मंदिरांवर सतत हमले करून आमची श्रद्धास्थाने नष्ठ केली अशा प्रकारच्या वातावरणामध्ये आम्हाला कित्येक वर्षे संघर्षाला सतत तोंड द्यावे लागले आणि स्वातंत्र्यानंतर देखील आमच्याच कांही सत्तालोभी लोकांनी आपल्या पुरातन परंपरा, वास्तू, धार्मिक श्रद्धास्थाने यांची पुनर्स्थापना अथवा पुनर्निर्माण करण्याकडे जसे लक्ष द्यायला पाहिजे होते तसे ते त्या लोकांनी दिले नाही; परंतु नंतर असे दिसू लागले की, ही मंडळी आपल्या आराध्य श्रद्धास्थानाबाबत स्वतःच प्रश्न उपस्थित करतात आणि न्यायालयामध्ये प्रभू श्रीरामचे अस्तित्वावरच प्रश्न उपस्थित करतात आणि याचा सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष, चीड, संताप होता आपल्याला नंतर हे लक्षांत आले असेल की, जेव्हा आपले शेजारी बांगलादेशमध्ये तेथील अत्पसंख्याक हिंदू समुदाय आणि त्यांची श्रद्धा पूजास्थानांवर हमले झाले तेव्हा भारतातील हिंदू समुदायामध्ये प्रचंड रोष व तीव्र नाराजी व्यक्त झालेली होती.

# कॉमिक्स चाहत्यांना मिळाली ब्लॉकबस्टर वीकेंडची पर्वणी

## पुणे कॉमिक कॉन २०२५ ने चाहत्यांना दिल्या अविस्मरणीय आठवणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रंची रोलच्या सौजन्याने आयोजित मारुती सुझुकी अरीना पुणे कॉमिक कॉन २०२५ ने पुणेकरांना या वर्षातील सर्वोत्तम ब्लॉकबस्टर वीकेंडची पर्वणी दिली आहे. अविस्मरणीय आठवणींसह हा कार्यक्रम संपूर्ण शहराला पॉप कल्चरच्या भव्य उत्सवात न्हाऊन काढणारा ठरला. पुण्यासह विविध भागांतून आलेल्या चाहत्यांना या दोन दिवसीय उत्सवाने नॉन-स्टॉप मनोरंजनासह, खास चाहत्यांशी संवाद साधण्यासाठी आणि इंडस्ट्रीतील नामांकित ब्रँड्सच्या आकर्षक अनुभवांसाठी एकत्र आणले. दोन दिवसांत २२,००० हून अधिक लोकांनी या उत्सवाला भेट दिली आणि १५०० पेक्षा जास्त लोकांनी कोस्प्ले मध्ये सहभाग घेतला ज्यामुळे हा एक नेत्रसुखद आणि उत्साही अनुभव ठरला. या कॉमिक कॉनमध्ये चाहत्यांनी वेगवेगळ्या पात्रांचे वेष परिधान केले होते. डेडपूल, कॅप्टन अमेरिका, डेअरडेविल, ग्रीन गॉब्लिन तसेच विविध प्रकारच्या स्पायडर-मॅनसारख्या सुपरहिरोंपासून ते फ्लिंटस्टोन्स, टीम रॉकेट, जास्मिन, मोआना आणि माउई यांसारख्या लोकप्रिय पात्रांचे रंगतदार कोस्प्ले केले. तसेच चेनसॉ मॅन, अकाशुकी (नारुटो), रेंगोकू आणि तंजीरो (डेमोन स्लेयर) या ॲनिमे पात्रांचेही उत्साही आणि सर्जनशील कोस्प्ले पाहायला मिळाले. पुणे कॉमिक कॉनने काही प्रसिद्ध कॉमिक बुक निर्मात्यांना या उत्सवासाठी आमंत्रित केले होते, ज्यामुळे हा विकेंड कॉमिक प्रेमींसाठी स्वप्नवत ठरला. पुरस्कार विजेते 'आर्ची कॉमिक्स' लेखक डॅन पॅरेंट यांची उपस्थिती चाहत्यांसाठी खास आकर्षण ठरली. त्यांनी आपल्या खास पॅनल आणि भेटीगाठीच्या सत्रांमध्ये त्यांच्या कारकीर्दीतील महत्त्वाचे अनुभव, कथाकथन तंत्राबद्दल माहिती आणि कारकिर्दीतील गमतीशीर आठवणी शेअर केल्या. त्यांच्यासोबत अभिजीत किणी स्टुडिओज, प्रसाद भट, बुल्सआय प्रेस, इंडसवर्स, बकरमॅक्स, गार्बेज बिन, आर्ट ऑफ सॅविओ, अक्षरा अशोक (हॅपीफ्लफ), सौमिन पटेल, लिलरोश, राजेश नागुलकोंडा, याली ड्रीम क्रिएशन्स, अर्बन टेल्स आणि भारतातील बरेच आघाडीचे कॉमिक बुक निर्माते मंचावर सहभागी झाले.

पुणे कॉमिक कॉनच्या मंचावर सादर करण्यात आलेल्या अविस्मरणीय परफॉर्मन्सेसनी कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन रोहन जोशी, रवी गुप्ता, साहिल शाह, अजीम बनातवाला आणि राहुल सुब्रमण्यम यांनी त्यांच्या विनोदाने आणि जबरदस्त पंचलाईन्सने प्रेक्षकांना खळखळून हसवले. तसेच लोकप्रिय 'द इंटरनेट सेड सो' (टीस) पॉडकास्ट टीम – वरुण ठाकूर, कौतुक श्रीवास्तव आणि आदार मलिक यांनी मंचावर धमाल मस्ती केली.

याशिवाय, चाहत्यांचा आवडता ॲकॅपेला ग्रुप 'व्हॉक्ट्रॉनिका' यांनी नॉस्टॅल्जिक मेडलीसह 'तांबडी चांबडी' यांसारख्या सादरीकरणांनी संपूर्ण वातावरण भारावून टाकले आणि हा दोन दिवसीय वीकेंड पुणेकरांसाठी संस्मरणीय बनवला.

स्टँड-अप कॉमेडियन राहुल सुब्रमण्यम म्हणाले, "हा अनुभव विलक्षण होता. पुणे माझ्या आवडत्या शहरांपैकी एक आहे. मी एक मंबईकर असूनही इथे अनेक वेळा आलो आहे आणि प्रत्येक वेळी हा अनुभव खास असतो. पुणे कॉमिक कॉनमध्ये पहिल्यांदाच मी एक क्विझ शो होस्ट केला आणि हा एक नवीन अनुभव होता. प्रेक्षकांचा उत्साह जबरदस्त होता, ज्यामुळे संपूर्ण अनुभव अधिक मजेदार बनला!"




# थोडक्यात



## पुण्यातून १३ जादा ट्रेन, धावत्या रेल्वेवर पाण्याचे फुगे फोडल्यास...

**पुणे (आरंभ पर्व) : होळी आणि धुळवडीच्या वेळी तीन दिवसांच्या सुट्टीने मुक्काम ठोकल्याने चाकरमान्यांचा उत्साह शिगेला पोहचला आहे. कुटुंबियांसोबत धुळवड साजरी करता यावी यासाठी अनेक जण आतुर झाले आहेत. होळीसाठी पुण्यातून तेरा जादा ट्रेन सोडण्यात येत आहे. गर्दी होऊ नये म्हणून मोठी खबरदारी घेण्यात येत आहे. तर दुसरीकडे होळीच्या दिवशी काही समाजकंटक धावत्या रेल्वे गाड्यांवर रंगाचे, पाण्याचे फुगे फोडतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. डोळ्याला इजा होण्याची भीती असते. रेल्वे पटरीजवळील दाट लोक वसाहतीत हा प्रकार आढळतो. त्यामुळे लोहमार्ग पोलिसांनी असा लोकांना कारवाईचा इशारा दिला आहे. उन्हाळ्याच्या सुटीत लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना मोठी गर्दी असते. ही बाब विचारात घेऊन पुणे रेल्वे विभागाने होळीनिमित्त पुणे ते दानापूर, गोरखपूर आणि मुझफ्फरपूरसाठी एकूण 13 विशेष रेल्वे फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांचे हाल होऊ नये म्हणून रेल्वे स्टेशनवर मोठा मंडप टाकण्यात आला आहे. प्रवाशांची व्यवस्था रेल्वे कडून करण्यात आली आहे. याबाबत पुणे विभागीय रेल्वे मंडळाचे अध्यक्ष राजेश कुमार वर्मा यांनी दिली. प्रवाशांसाठी मोठी व्यवस्था रेल्वे स्टेशनवर करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशनवर गर्दी होऊ नये म्हणून दानापूर एक्सप्रेस किंवा उत्तर भारतात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने त्यांच्यासाठी प्लॅटफॉर्मच्या बाजूला मंडप टाकण्यात आलेला आहे.**

**असे आहे रेल्वेचे वेळापत्रक : पुणे-दानापुर-पुणे विशेष (२ फेऱ्या) गाडी क्रं (०१४१९) विशेष ट्रेन पुणे येथून ११.०३.२०२५ रोजी १९:५५ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी ०४.३० वाजता दानापुर येथे पोहोचेल. गाडी क्र. (०१४२०) ही विशेष ट्रेन दानापुर येथून १३.०३.२०२५ रोजी ०६:३० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी १७:३५ वाजता पोहोचेल. पुणे – मालदा टाउन विशेष ट्रेन (२ फेऱ्या) गाडी क्रं (०३४२६) विशेष ट्रेन पुणे येथून २३.०३.२०२५ रोजी २२.०० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी १६.३० वाजता मालदा टाऊन येथे पोहोचेल. गाडी क्रं (०३४२५) ही विशेष ट्रेन मालदा टाऊन येथून २१.०३.२०२५ रोजी १७.३० वाजता आणि तिसऱ्या दिवशी ११.३५ वाजता पुणे येथे पोहोचेल. हडपसर-हिसार विशेष ट्रेन (४ फेऱ्या) गाडी क्रं (०४७२६) ही विशेष ट्रेन हडपसर येथून १०.०३.२०२५ आणि १७.०३.२०२५ रोजी १७.०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २२.२५ वाजता हिसार येथे पोहोचेल. गाडी क्रं (०४७२५) ही विशेष ट्रेन हिसार येथून ०९.०३.२०२५ आणि १६.०३.२०२५ रोजी ०५.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १०.४५ वाजता हडपसर येथे पोहोचेल. कलबुर्गी- सर एम विश्वसरया टर्मिनल बेंगळुरू विशेष – (४ फेऱ्या) गाडी क्रं (०६५२०) ही विशेष ट्रेन कलबुर्गी येथून १४.०३.२०२५ आणि १५.०३.२०२५ रोजी ०९.३५ वाजता.**

# गॅस पुरवठा खंडीत करण्याची भीती दाखवून ज्येष्ठाची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गॅस पुरवठा खंडीत करण्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी ज्येष्ठाची साडेचार लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक बाणेर भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. बाणेर भागात एमएनजीलकडून गॅस पुरवठा करण्यात येतो. सायबर चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. गॅस पुरवठा कंपनीतील अधिकारी असल्याची बतावणी चोरट्यांनी केली.




देयक थकीत असल्याने गॅस पुरवठा खंडीत करण्यात येईल, अशी बतावणी चोरट्यांनी केली. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना एक लिंक पाठविली. चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्याची गोपनीय माहिती घेतली. लिंकवर पाठविण्यात आलेली एपीके फाईल उघडताच ज्येष्ठाच्या बँक खात्यातून चार लाख ४७ हजार रुपये चोरट्यांनी चोरुन नेले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीसी निरीक्षक नवनाथ जगताप तपास करत आहेत. नवीन गॅस जोड देण्याच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एकाची चार लाख ४० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली.

# मल्हार सर्टिफिकेशन नावाला खंडोबा देवस्थानचा पाठिंबा

## ग्रामस्थ मंडळाचा विरोध

**जेजुरी (दै. आरंभ पर्व)**

साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेला जेजुरीचा मल्हारी आता सर्टिफिकेशनच्या मुद्द्यावरून वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे .राज्यातील मटणाच्या दुकानांना मल्हार सर्टिफिकेशन द्यायचे की नाही यावर क्रिया प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. काल खंडोबा देवसंस्थानचे एक विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी एक पत्रक प्रसिद्ध करून मटन दुकानांना देण्यात येणाऱ्या सर्टिफिकेटवर मल्हार नाव देण्यास विरोध केला आहे. खंडोबा हा शाकाहारी देव असल्याने दुसरे कोणतेही नाव या योजनेला द्यावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

तर आज सकाळी श्री मार्तंड देवस्थानच्या कार्यालयात झालेल्या तातडीच्या बैठकीमध्ये मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी घेतलेल्या योजनेचे स्वागत करण्यात आले. श्री मल्हार म्हणजेच खंडोबा हा साऱ्या हिंदू धर्माचे कुलदैवत आहे .प्रत्येक मल्हार भक्त आपल्या कोणत्याही शुभकार्याची सुरुवात कुलदैवताच्या साक्षीने व त्याचे स्मरण करून करतो .हिंदू समाजामध्ये मांस मटन विक्री संदर्भात मल्हार सर्टिफिकेट देण्याची योजना सुरू करण्याबाबत घेतलेल्या भूमिकेचे यावेळी स्वागत करण्यात आले. विश्वस्त मंडळाने बहुमताने या योजनेस मल्हार सर्टिफिकेशन असे नाव देण्यास पाठिंबा दिला.

या बैठकीसाठी मुख्य विश्वस्त अभिजीत देवकाते, विश्वस्त मंगेश घोणे ,ॲड विश्वास पानसे, अनिल सौंदडे , पोपट खोमणे, हे उपस्थित होते . मटन दुकानांना मल्हार सर्टिफिकेशन देण्यास पाठिंबा असल्याचे निवेदन देवस्थान समितीने प्रसिद्ध केले आहे .मुख्य विश्वस्त अभिजीत देवकाते यांनी राज्यातील अनेक दुकानांना मल्हार मटन शॉप, तुळजाभवानी मटन शॉप अशी नावे यापूर्वी देण्यात आलेली आहेत .आता विरोध करण्याचे कारण नाही.



आम्ही या योजनेचे स्वागत करीत आहोत बहुमताने पाठिंबा देत आहोत असे सांगितले. जेजुरीचा खंडोबा हे पूर्णतः शाकाहारी दैवत असल्याने त्याला मांसाहारी नैवेद्य चालत नाही. मांसाहारी नैवेद्य देवाची धाकटी बायको बानू देवी हिला दाखवला जातो. खंडोबा गडावर मटणाचा नैवेद्य कधीही नेला जात नाही. शासनाने सर्टिफिकेटची आणलेली योजना चांगली असून त्याला आमचा पाठिंबा आहे. मात्र या सर्टिफिकेशन योजनेस मल्हारी नाव न देता इतर नाव द्यावे. कोणत्याही देवाचे नाव देण्यास आमचा विरोध आहे असे ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी स्पष्ट केले.

# मधुमेह चिकित्सेमध्ये भारत जगाला मार्ग दाखवू शकतो - डॉ. व्ही मोहन

## चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युट तर्फे 9 व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेला मोठा प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतामध्ये आपण स्वेदशी बनावटीची किफायतशीर वैद्यकीय उपकरणे,मॉलिक्युल्स,थेरपीज् विकसित करून ती जगाला देऊ शकतो. मधुमेह चिकित्सेमध्ये जगाला मार्ग दाखवण्याचे सामर्थ्य भारतामध्ये आहे,असे मत मद्रास डायबेटिस रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष व डॉ.मोहनस् डायबेटिस स्पेशालिटिज सेंटर,चेन्नईचे अध्यक्ष डॉ.व्ही मोहन यांनी यावेळी व्यक्त केले. चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युट तर्फे पुण्यात जे.डब्ल्यू.मॅरिएट येथे 7 ते 9 मार्च 2025 दरम्यान 9 व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषद - 2025 (इंटरनॅशनल डायबेटिस समिट) चे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी स्वीडन येथील कॅरोलिन्स्का इन्स्टिट्युटचे प्रा.डॉ.सी. व्ही.संजीवी, युके नॅशनल इन्स्टिट्युट फॉर हेल्थ रिसर्च (एनआयएचआर) चे संचालक आणि सेंटर फॉर एथनिक हेल्थ रिसर्चचे संचालक आणि द रिअल-वर्ल्ड एव्हिडन्स युनिटचे संचालक डॉ.कमलेश खुंटी,चेलाराम फाऊंडेशनचे उपाध्यक्ष डॉ.प्रकाश भुपटकर, चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युटचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उन्नीकृष्णन ए.जी., चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटचे मुख्य वैद्यकीय अधिक्षक व विंग कमांडर (डॉ.) हर्षल मोरे (निवृत्त) आणि वैद्यकीय सेवा विभागाच्या प्रमुख डॉ.वेदवती पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी डॉ.व्ही मोहन यांना मधुमेह क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉ.व्ही मोहन म्हणाले की,ज्ञान हे प्रकाशासारखे असते आणि त्याचा प्रसार होत राहतो.या परिषदेच्या माध्यमातून वर्षानुवर्षे तेच होत आहे.सध्याचा काळ हा भारतासाठी महत्त्वाचा आहे.भारतातील औषध निर्माण क्षेत्र हे जेनरिक्स आणि गुणवत्तेच्या बाबतीत जगात आघाडीवर आहे. आपल्या गरजांप्रमाणे आपण स्वदेशी बनावटीचे किफायतशीर वैद्यकीय उपकरणे,थेरपीज् विकसित करू शकतो.मधुमेह चिकित्सेमध्ये जगाला मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य भारतीय वैद्यकीय क्षेत्रात आहे,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रा.डॉ.सी.व्ही.संजीवी म्हणाले की,भारतात मधुमेहींची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. याशिवाय मधुमेहाच्या पूर्व टप्प्यातील (प्रि डायबेटिक) संख्या देखील लक्षणीय आहे.त्यामुळे हे कमी करण्यासाठी जोखमीच्या घटकांचा विचार करून वेलनेस या संकल्पनेवर जास्त लक्ष केंद्रित केले पाहिजे. आपल्याकडे एवढा मोठा माहितीसाठा असताना आपण आपल्या देशातील मधुमेह चिकित्सेचे वेगळे प्रारूप विकसित करू शकतो.

डॉ.कमलेश खुंटी म्हणाले की,भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर नवकल्पना समोर येत आहेत,ही सकारात्मक बाब आहे.

डॉ.प्रकाश भुपटकर यांनी चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युटचे अध्यक्ष श्री. लाल चेलाराम यांचा संदेश वाचून दाखवला.भारतातील संशोधन हे जगासाठी संदर्भ बनू शकतो,असे मत त्यांनी व्यक्त केले.

मधुमेह आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या मधुमेहाच्या धोक्याचा व गुंतागुंतींचा सामना करण्यासाठी योग्य उपाययोजना जाणून घेण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेत मधुमेहाच्या गुंतागुंतींचे व्यवस्थापन, किफायतशीर दरात मधुमेह उपचार, नवीन संशोधन आणि मधुमेह व्यवस्थापनातील तंत्रज्ञानाची भूमिका या विषयांवर चर्चा करण्यात आली. या परिषदेमध्ये मधुमेहाचा सामना करण्यासाठी स्ट्रेंथ ट्रेनिंग, गरोदरपणातील मधुमेह आणि प्रॅक्टिकल इन्शुलिन या विषयावर कार्यशाळा घेण्यात आल्या.

नामवंत भारतीय व आंतरराष्ट्रीय तज्ञांनी या परिषदेत संवाद साधला. या परिषदेला 2500 हून अधिक डॉक्टर्स उपस्थित होते.

9 व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषद - 2025 चे उद्दिष्ट देशातील आरोग्यसेवेत कार्यरत असणाऱ्यांना मधुमेह आणि त्याच्या गुंतागुंतींबद्दल सर्वसमावेशक ज्ञान प्रदान करणे होते.



# थोडक्यात



## दुय्यम निबंधक कार्यालयात पाणी पिण्यासाठी कपाचा वापर



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : हवेली तालुका, पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहर यांचे कार्यक्षेत्र असलेले सह दुय्यम निबंधक वर्ग २ कार्यालय हवेली २१व २२कोथरूड पुणे या कार्यालयामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी कपाचा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. याविषयी सोरतापवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष कड यांनी सांगितलेकी दस्ताच्या सही शिक्याच्या नकला घेण्यासाठी मी या कार्यालयात गेलो असता पिण्यासाठी पाण्याची शोधाशोध केली असता तेथे एक कुलर दिसला त्या कुलर वर पाणी पिण्यासाठीकप ठेवला असल्याचे निदर्शनास आले. आजूबाजूला चौकशी केली असता तिथे पाणी पिण्यासाठी कपच ठेवल्याचे सांगण्यात आले .अनेक नागरिक येथे दररोज येतात . तहान लागली तर पाणी पितात मग हा कप रोजच्या रोज साफ केला का जातो का याचे मात्र उत्तर कोणीही दिले नाही. त्यामुळे या कपाविषयी शंका निर्माण झाली असून निबंध कार्यालयाला ग्लास मिळत नाही का असा प्रश्न देखील आलेल्या नागरिकांनी उपस्थित केला. या कार्यालयाचे उद्घाटन नुकतेच झाले असून यासाठी कप ठेवला गेल्यामुळे याची येथे चहासाठी कप नसून पाणी पिण्यासाठी कप अशी नवीनच ओळख निर्माण झाली आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार : आ. शेखर निकम



संगमेश्वर (आरंभ पर्व) : छत्रपती संभाजी महाराजांच्या अतुलनीय पराक्रमाला आणि बलिदानाला सलाम करत, संगमेश्वर येथे त्यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्याची ऐतिहासिक घोषणा करण्यात आली. आमदार शेखर निकम, मंत्री ना. नितेशजी राणे आणि महायुतीतील मान्यवरांच्या उपस्थितीत या स्मारकाची घोषणा करण्यात आली. या वेळी बोलताना आमदार शेखर निकम म्हणाले, "छत्रपती संभाजी महाराज हे केवळ मराठ्यांचेच नव्हे, तर संपूर्ण हिंदुस्थानच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. त्यांच्या शौर्यगाथेचा जागर करत महायुतीच्या माध्यमातून संगमेश्वर येथे न भूतो न भविष्यती असे स्मारक उभारणार आहे. हे स्मारक भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. मंत्री ना. नितेशजी राणे यांनी सांगितले की, "संभाजी महाराजांचे बलिदान आणि त्यांची हिंदवी स्वराज्यासाठीची लढाई हा इतिहासातील सुवर्णअध्याय आहे. या स्मारकाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा जागर देशभर होईल." यावेळी आमदार प्रसाद लाड, माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी आमदार प्रमोद जठार, शिवसेना जि. प्र. राहुल पंडित, भाजप जिल्हाध्यक्ष राजेश सारंग, माजी जि. प. अध्यक्ष राजेंद्र महाडिक, माजी जि. प. अध्यक्ष रोहन बने, श्री. घोरपडे, वर्षा ढेकणे, पूजा निकम आदी मान्यवर उपस्थित होते. "धर्मो रक्षती रक्षितः" या तत्त्वाने प्रेरित होत हिंदू धर्म रक्षण दिनाच्या निमित्ताने या स्मारकाची संकल्पना पुढे आली. हे स्मारक फक्त वास्तू नसून, भविष्यातील पिढ्यांना छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय पराक्रमाची आठवण करून देणारे प्रेरणास्थळ ठरेल, असा दृढ विश्वास आमदार शेखर निकम यांनी व्यक्त केला. संगमेश्वरच्या पवित्र भूमीत उभारले जाणारे हे स्मारक संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचे स्थान ठरेल, अशी भावना यावेळी सर्व मान्यवरांनी व्यक्त केली.

# चार वर्षात ३८ हजार गरजू रुग्णांना मोफत डायलिसिसचा लाभ

## एएनपी केअर फाउंडेशनतर्फे रहाटणी येथे पूर्णतः मोफत सुविधा; २० हजार रुग्णांवर फिजिओथेरपीचे उपचार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक बांधिलकी आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून चार वर्षांपूर्वी सुरु केलेल्या एएनपी केअर फाउंडेशनच्या डायलिसिस केंद्रात ३८ हजार १९५ गरजू रुग्णांनी लाभ घेतला आहे. या डायलिसिस केंद्राला चार वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कृतज्ञता, तसेच पॉलिकॅब सोशल वेल्फेअर फाउंडेशच्या वतीने उभारलेल्या विस्तारित कक्षाच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन केले होते.



यावेळी पॉलिकॅब इंडिया लिमिटेडचे प्रमोटर अजय जयसिंगानी, कार्यकारी संचालक राकेश तलाठी, सहयोगी उपाध्यक्ष नीरज कुंदनानी, एएनपी केअर फाउंडेशनचे प्रमुख मनोहर फेरवानी, सुनील अडवाणी, सुरेश जेठवानी, सुरेश फेरवानी, रवी फेरवानी, अशोक वासवानी, ऋषी अडवाणी, जवाहर कोटवानी, नंदकुमार काटे यांच्यासह सिंधी समाजातील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राकेश तलाठी म्हणाले, "समाजासाठी समर्पित भावनेने कार्यरत एएनपी केअर फाऊंडेशनशी जोडले गेलो आहोत याचा आनंद आहे. गोरगरीब रुग्णांना डायलेसिसची सुविधा अनेकांसाठी नवसंजीवनी ठरली आहे. पॉलिकॅब इंडिया अनेक सामाजिक उपक्रमांत भरीव योगदान देत आहे. यापुढेही डायलिसिससाठी काही मदत लागल्यास आमचे सहकार्य राहील."

मनोहर फेरवानी म्हणाले, "कोरोना काळात या डायलेसिस केंद्राची सुरुवात झाली. पहिल्या वर्षी या डायलिसिस केंद्रावर अकरा मशिन्स होत्या. पुढे त्यात आणखी भर पडली. सध्या एकूण २५ मशिन्स कार्यरत आहेत. दोन तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली जवळपस २५ प्रशिक्षित तंत्रज्ञ आणि स्टाफ डायलिसिस करत आहे. येथील स्वच्छता, रुग्णांसाठी असलेल्या सुविधांमुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे."

"डायलेसिससह फिजिओथेरपी उपचार केंद्र सुरु असून, तीन डॉक्टर ही सुविधा पुरवतात. पिंपरी–चिंचवडसह पुणे शहर, आंबेगाव व खेड तालुक्यातील गरजू रुग्णांना या सुविधांचा लाभ होत आहे. सोमवार ते शनिवार रोज सकाळी ८ ते संध्याकाळी ६ या वेळेत रुग्णांना डायलिसिस सेवा दिली जाते.

गरजू रुग्णांनी रॉयल मायस्टिक, २८/2 ब, शिवराजनगर, रहाटणी, पिंपरी-पुणे येथे किंवा ९९७००४३००५/०६ किंवा contact@anpcarefoundation.org येथे नावनोंदणी करावी. डायलिसिससह नाश्ता व अन्य सुविधा पूर्णतः मोफत दिली जाते. अधिकाधिक गरजू रुग्णांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा," असेही मनोहर फेरवानी यांनी नमूद केले.

# ट्रान्सयुनियन सिबिल आणि फेस यांनी ग्राहक शिक्षण उपक्रम सुरू करण्यासाठी सहकार्य केले

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ट्रान्सयुनियन सिबिल आणि फिनटेक असोसिएशन फॉर कंझ्युमर एम्पॉवरमेंट (FACE) हे भारतात आर्थिक साक्षरता आणि क्रेडिट जागरूकता वाढवण्यासाठी एकत्र येत आहेत. सिबिल जागरण नावाचा हा उपक्रम क्रेडिट शिक्षण सुधारण्याचा आणि फिनटेक सोल्यूशन्सद्वारे ग्राहकांना क्रेडिटची सहज उपलब्धता सुलभ करण्याचा प्रयत्न करतो.

या करारांतर्गत, ट्रान्सयुनियन सिबिल ज्ञान आणि कौशल्य प्रदान करेल, सह-ब्रँडेड आणि कस्टमाइज्ड शैक्षणिक सामग्री विकसित करेल. फिनटेक क्षेत्रातील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मान्यताप्राप्त स्व-नियामक संघटना (SRO) FACE, ग्राहकांमध्ये आर्थिक साक्षरता आणि क्रेडिट जागरूकता वाढवण्यासाठी 165 हून अधिक फिनटेक सदस्यांच्या नेटवर्कसह काम करेल.

**• या सहकार्याचे उद्दिष्ट आर्थिक साक्षरता वाढवणे आणि विविध माध्यमांवर कस्टमाइज्ड कंटेंटद्वारे ग्राहकांना कर्जाची सहज उपलब्धता करणे हे आहे**

ट्रान्सयुनियन सीबीआयएलचे माहिती भांडार, डेटा क्षमता आणि विश्लेषणात्मक अंतर्दृष्टी आर्थिक साक्षरतेबद्दल संबंधित सामग्री देण्यासाठी चांगली स्थिती निर्माण करते. या सामग्रीमध्ये ईमेल, लेख, व्हिडिओ, वेबिनार आणि पॉडकास्टचा समावेश असेल, आणि ते FACE द्वारे प्रसारित केले जातील.

या मोहिमेचा विस्तार आणि प्रभाव जास्तीत जास्त वाढवण्यासाठी FACE स्वतःचे आणि त्याच्या सदस्यांच्या डिजिटल चॅनेलचा वापर करेल.

**ग्राहक शिक्षणात संपूर्ण आर्थिक परिसंस्थेच्या सहभागावर भर देताना, FACE चे सीईओ सुगंध सक्सेना म्हणाले: "FACE आणि TransUnion CIBIL सारख्या संस्था आर्थिक उत्पादने आणि ग्राहकांमधील दरी भरून काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. हा संयुक्त उपक्रम व्यक्तींना सुजाण आणि जबाबदार आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनवण्यावर भर देतो. जबाबदार क्रेडिट वर्तन आणि कर्ज घेण्याच्या पद्धतींबद्दल ग्राहकांशी सतत संवाद साधणे हे क्रेडिट आणि वित्तीय परिसंस्थेच्या मजबूततेची खात्री करण्यासाठी अविभाज्य आहे. एक माहितीपूर्ण आणि जबाबदार ग्राहक हा आर्थिक परिसंस्थेची एक मालमत्ता आहे आणि राष्ट्राच्या आर्थिक कल्याण आणि स्थिरतेसाठी महत्त्वाचा आहे."**

FACE सोबतच्या भागीदारीची घोषणा करताना, ट्रान्सयुनियन CIBIL चे MD आणि CEO भावेश जैन म्हणाले: "ग्राहकांना आता पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात आर्थिक उत्पादनांचा ॲक्सेस मिळाला आहे. त्यांचे आर्थिक आरोग्य सुधारण्यासाठी या उत्पादनांचा वापर कसा करायचा याची त्यांना समज नसण्याची शक्यता आहे. डिसेंबर २०२४ मध्ये फिनटेकच्या 28% ग्राहक न्यू-टू-क्रेडिट (NTC) 1 होते हे लक्षात घेता, ग्राहकांना त्यांचे क्रेडिट सकारात्मक पद्धतीने व्यवस्थापित करायचे असेल तर फिनटेकसाठी ग्राहक साक्षरता आणि शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. ट्रान्सयुनियन CIBIL आणि FACE च्या प्रयत्नांमुळे ग्राहक आर्थिकदृष्ट्या जागरूक आणि स्वावलंबी होईल."

# गाडेची येरवडा कारागृहात रवानगी

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश बुधवारी देण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानुसार गाडेची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे. स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात २५ फेब्रुवारी रोजी प्रवासी तरुणीवर दत्तात्रय रामदास गाडे (वय ३५, रा. गुनाट, ता. शिरूर, जि. पुणे) याने बलात्कार केला होता. सकाळी सहाच्या सुमारास पीडित तरुणी गावी निघाली होती. गाडेने तिच्याकडे वाहक असल्याची बतावणी केली होती. त्यानंतर गाडेने शिवशाही बसमध्ये तरुणीला जिवे मारण्याची धमकी देऊन तिच्यावर बलात्कार केला होता. बलात्कार करुन पसार झालेल्या गाडेला पोलिसांनी शिरुर तालुक्यातील गुनाट गावातून तीन दिवसांनी अटक केली होती.



## जाहीर नोटीस

**सर्व संबंधित लोकांस कळविण्यात येते की, खाली परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही १) बाळू राघु कांबळे, २) सिताराम राघु कांबळे, दोघेही राहणार गुंजवणे, तालुका : वेल्हा, जिल्हा: पुणे, पुणे ४१२२१३. यांची वारसामालकी हक्क वहिवाटीची असून त्यांनी खाली परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, वादरहित व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांना देऊन सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे.**

**तरी कोणाही इसम, संघटना, भागीदारी फर्म, संस्था (कंपनी किंवा इतर) कोणाचाही तरी खाली परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीमध्ये अथवा तीपैकी कोणत्याही भागामध्ये खरेदी, गहाण, अदलाबदल, भाडेहक्क, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, पट्टयाने, अधिकार, वारसा, बक्षिस, विश्वस्थ अधिकार, निर्वाह, अधिकार, विकसन अधिकार, समझोता करार, करारनामा, तडजोड, अभिहस्तांकन, ताबा, वहिवाटीचे अधिकार वा कोणत्याही न्यायिक अर्धन्यायिक न्यायालयाचे आदेश, हुकूम, इत्यादी वा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध, वाद असल्यास त्यांनी त्याबाबत योग्य त्या लेखी पुराव्यासह आमचे खाली दिलेल्या पत्त्यावर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १० (दहा) दिवसात प्रत्यक्ष संपर्क साधावा, व पोहोच घ्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास ज्या कोणाचेही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून व त्यानंतर कोणाचीही हरकत मान्य करण्यात येणार नाही. असे समजून वरील मिळकत मालकांनवरील मिळकतीबाबत पणनयोग्य हक्क असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल पुढील खरेदी व्यवहार पुर्ण करतील, याची दखल घ्यावी.**

**परिशिष्ट**

**तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका, वेल्हा, मे. दुय्यम निबंधक साहेब, वेल्हा यांचे हद्दीतील, तसेच मे. तहसिलदार साहेब, वेल्हा यांचे मुलकी हद्दीतील, तसेच जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती वेल्हा यांच्या हद्दीतील तसेच मे. तहसिलदार साहेब वेल्हा यांच्या मुलकी हद्दीतील तसेच ग्रामपंचायत मौजे फणशीच्या हद्दीतील गाव फणशी येथील गट नंबर ३६५ (जुना सर्व्हे नंबर २९/१ व २९/२) यांसी क्षेत्र १ हेक्टर ८८.२० आर आधिक पोटखराबा ०० हेक्टर ४३ आर असे मिळून एकूण क्षेत्र ०२ हेक्टर ३१.२० आर यांसी आकार २ रुपये ९४ पैसे यापैकी लिहून देणार यांच्या हिश्श्याची ०२ हेक्टर ११.२० आर ही जमीन मिळकत या जमीन मिळकतीच्या चर्तु:सीमा पुर्वेस गट नंबर ३६१ ही मिळकत. दक्षिणेस : गट नंबर ३९८ ही मिळकत. पश्चिमेस : गट नंबर ३६४ व गट नंबर ३६६ या मिळकती. उत्तरेस : गट नंबर ३६४ व गट नंबर ३६१ या मिळकती.**

**ही जाहीर नोटीस ता. ०२/०७/२०२४**

**सही/-**
**श्री. शंकर मारुती जाधव (ॲडव्होकेट)**
**ऑफिस पत्ता:-ए-२०१, श्री कॉम्पलेक्स एन. डी. ए. रोड**
**शिवणे-उत्तमनगर, पुणे ४११ ०२३.**
**फोन : ९८६०२०४०२६/९६२३१११७००**



## १९ वर्षाचा युवक बेपत्ता

**शिरुर (दै. आरंभ पर्व)**

शिरुर शहरा जवळील दाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर येथील १९ वर्षाचा युवक दिनांक ६ मार्चच्या रात्री घरातून बेपत्ता झाला असून त्याच गावात (दिनांक १२ मार्च रोजी) विहिरीत शिर नसलेला मृतदेह एका पोत्यात सापडल्याने खळबळ उडाली आहे. हा मृतदेह बेपत्ता माउली गव्हाणे यांचा की अन्य कोण्याचा याचा शोध पोलीस घेत आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दाणेवाडी येथील माउली सतीश गव्हाणे वय -१९ हा दिनांक ६ मार्चला घरातून कोणाला काही न सांगता निघून गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी शिरुर येथील कॉलेजमध्ये तो दिसला होता. त्यानंतर त्याचा मोबाईल बंद झाला. माउली बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनला देण्यात आली होती. दरम्यान आज १२ मार्च रोजी सकाळी दाणेवाडीतील एका विहिरीत शीर नसलेला मृतदेह पोत्यात आढळून आला.

# टोळक्याकडून वाहनांची तोडफोड

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

शहरात गेल्या काही दिवसांपासून वाहन तोडफोडीचे सत्र सुरुच आहे. चिंचवड येथील वर्दळीच्या केएसबी चौकात बुधवारी (१२ मार्च) साडेचारच्या सुमारास चार ते पाच जणांच्या टोळक्याने दगड आणि हत्यारांनी बारा मोटारीच्या काचा फोडल्या आणि टोळके पसार झाले. रात्री उशिरापर्यंत एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.



चिंचवड येथील केएसबी चौक हा शहरातील औद्योगिक पट्ट्यातील वर्दळीच्या चौकांपैकी एक महत्वाचा चौक आहे. सकाळ आणि सायंकाळच्या सुमारास या चौकात कामाला जााऱ्या-येणाऱ्या कामगारांची रेलचेल असते. सतत वर्दळीचा असणारा हा चौक आहे. या चौकात पिपरी, निगडी, एमआयडीसी भोसरी आणि चिखली या चार पोलीस ठाण्यांची हद्द आहे. चौकातून गेलेल्या समतल विलगकाच्या (ग्रेडसेपरेटर) बाजूला असणाऱ्या रस्त्यावर परिसरातील अनेक वाहन चालक आपली वाहने उभी करतात. बुधवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास चौकात चार ते पाच जणांचे टोळके आले.

त्यांनी अचानक चौकात उभ्या असलेल्या वाहनांना टार्गेट करीत हातातील दगड व हत्यारांनी काचांची तोडफोड करण्यास सुरूवात केली. काही मिनिटात या टोळक्याने बारा मोटारीच्या काचा फोडल्या आणि टोळके पसार झाले.

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल फडतरे म्हणाले, 'चार ते पाच जणांच्या टोळकयाने रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटारीच्या काचा फोडल्याची माहिती दिली. आरोपी कोण आहेत, त्यांच्या हातात नेमकी कोणती हत्यारे होती, याबाबत परिसरातील 'सीसीटीव्ही'च्या आधारे शोध घेतला जात आहे. आरोपी लवकरच हाती लागतील'.

# स्नेह फाउंडेशनला मिळाला ग्लेनमार्क फाउंडेशनचा पुरस्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ग्लेनमार्क फार्मास्यूटिकलची कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी शाखा असलेल्या ग्लेनमार्क फाउंडेशनचा ग्लेनमार्क न्यूट्रिशन अवार्ड २०२५ हा पुरस्कार पुण्यातील स्नेह फाउंडेशन या संस्थेला मिळाला. नाविन्यता, प्रभाव आणि शाश्वतता या माध्यमातून कुपोषणाशी सामना करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांचे हे पाचवे वर्ष असून त्यातून या कार्यासाठी ग्लेनमार्कची कटिबद्धता अधोरेखित झाली आहे. ग्लेनमार्कची प्रक्रिया भागीदार इडोब्रो, शाश्वतता भागीदार यूएन ग्लोबल कॉम्पॅक्ट नेटवर्क इंडिया आणि इकोसिस्टीम भागीदार इम्पॅक्ट फोर न्यूट्रिशन या संस्थांच्या सहकार्याने हे पुरस्कार देण्यात येतात.




या पुरस्कारांना प्रचंड प्रतिसाद मिळाला असून त्यासाठी २२ राज्यातील १६८ जिल्ह्यांमधून ४०३ प्रवेशिका आल्या होत्या. त्यामधून स्नेह फाउंडेशन सोबतच ग्रामीण एनजीओचा पुरस्कार पश्चिम बंगालमधील बैकुंठपूर तरुण संघ, सुंदरबन या संस्थेला तर अन्य वर्गातील पुरस्कार राजस्थानच्या जयपूर येथील महावीर इंटरनॅशनल फाउंडेशन ट्रस्ट या संस्थेला जाहीर करण्यात आला आहे. तिन्ही विजेत्या संस्थांना त्यांच्या जिल्ह्यांमध्ये परिवर्तनकारी प्रकल्प राबविण्यासाठी प्रत्येकी दोन लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे.

ग्लेनमार्क फाउंडेशनने कुपोषणाला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणून महत्त्व दिले असून ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांवर तसेच गर्भवती आणि स्तनपान देणाऱ्या मातांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विविध कार्यक्रम आणि हस्तक्षेपांद्वारे कुपोषणाशी लढण्याच्या दृष्टिकोनाचा वापर फाउंडेशनने केला आहे. या अंतर्गत कुपोषण दूर करण्यासाठी आणि भारताच्या विविध प्रदेशांमध्ये समग्र पोषण उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक संकल्पाची पुष्टी करणे हे ग्लेनमार्क न्यूट्रिशन अवॉर्ड्सचे उद्दिष्ट आहे.

स्नेह फाउंडेशनला अर्बन एनजीओच्या श्रेणीत विजेता घोषित करण्यात आले. त्याबद्दल स्नेह फाउंडेशन च्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रद्धा देव म्हणाल्या की "हा पुरस्कार जिंकणे हे आमच्या टीमच्या, विशेषतः सामुदायिक आरोग्य कर्मचाऱ्यांच्या, बाल कुपोषण दूर करण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे प्रतीक आहे. या अनुदानामुळे आम्हाला आमची पोहोच वाढवता येईल, लवकर निदान सुधारता येईल आणि जीव वाचवणारे शाश्वत हस्तक्षेप राबवता येतील. या सन्मानाबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत आणि मुलांसाठी निरोगी भविष्य निर्माण करण्याच्या आमच्या ध्येयात समर्पित राहू."

याप्रसंगी महाराष्ट्र सरकारच्या माता-बाल आरोग्य आणि पोषण अभियानाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. राजू जोतकर म्हणाले, "निष्पक्षता, पारदर्शकता आणि प्रभाव यांची निश्चिती देणाऱ्या सुसंरचित चौकटीमध्ये राहून ग्रँड ज्यूरीचा सदस्य म्हणून काम करणे हा एक आनंददायी अनुभव होता. विविध भौगोलिक प्रदेशांतील पुरस्कार विजेत्यांमुळे या उपक्रमाची प्रामाणिकता आणि स्पर्धात्मकता दिसून येते. भारताचे पोषण संक्रमण आणि स्थूलतेबाबत वाढत्या चिंता लक्षात घेता, भविष्यातील उपक्रमांमध्ये जास्त वजनाशी संबंधित आरोग्य जोखमींचाही विचार व्हायला हवा. असंसर्गजन्य रोगांशी लढण्यासाठी राष्ट्रीय प्रयत्नांशी ते सुसंगत असतील. पोषण पुरस्काराच्या या उपक्रमामुळे भारताचे आरोग्य आणि कल्याण बळकट होत राहतील, अशी मला प्रामाणिकपणे आशा आहे."

याप्रसंगी बोलताना ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडच्या कॉर्पोरेट सर्व्हिसेसच्या कार्यकारी संचालक चेरिल पिंटो म्हणाल्या, "ग्लेनमार्क फाउंडेशनमध्ये आमचा असा विश्वास आहे की निरोगी मुले ही निरोगी जगाचा पाया असतात. पोषणाबाबत आमच्या कटिबद्धतेतून सामाजिक कल्याणासाठी दीर्घकालीन दृष्टीकोन प्रतिबिंबित होतो. या वर्षी पुरस्कारासाठी आवेदनांतून केवळ पोषण सुधारण्या साठीची धोरणे दिसली नाहीत, तर शाश्वत व दीर्घकालीन उपायांचा शोधही घेण्यात आला.




## थोडक्यात



### डीपीएस हिंजवडीच्या ‘ड्रामा ओक्लॉक’ने प्रेक्षकांचे घेतले लक्ष

पुणे (आरंभ पर्व) : हिंजवडी येथील दिल्ली पब्लिक स्कूलने त्यांचा बहुप्रतिक्षित नाट्य कार्यक्रम ‘ड्रामा ओक्लॉक’ यशस्वीरित्या आयोजित केला, ज्यामध्ये इयत्ता तिसरी ते सहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरणासह प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मुंबईतील ज्येष्ठ नाट्य कलाकार आणि लेट्स एक्स्प्रेस अकॅडमी ऑफ लँग्वेज अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट च्या संस्थापक व प्राचार्य नूतन राज होत्या. या कार्यक्रमात दोन क्लासिक नाटक - द विझार्ड ऑफ ओझेड आणि द बिशप्स कँडलस्टिक्स यांचा समावेश होता, ज्यांनी या कार्यक्रमात उत्साह आणि सर्जनशीलतेची भर केली. पालक आणि पाहुण्यांनी या युवा कलाकारांचे त्यांचा आत्मविश्वास, भावपूर्ण कथाकथन आणि रंगमंचावरील उपस्थिती याबद्दल कौतुक केले. या कार्यक्रमाला मोठे यश मिळवून देण्यासाठी आणि दयाळूपणा व स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचे जीवन बदलणारे नैतिक धडे दिल्याबद्दल शाळेने विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे मनापासून कौतुक केले.

### खेड खरेदी विक्री संघाची निवडणुक; ९ जागांच निकाल जाहीर

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या १८ जागांपैकी ९ जागा बिनविरोध झाल्या तर ९ जागांसाठी मतदान घेण्यात आले. नऊ जागांसाठी १७ उमेदराव रिंगणात होते. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ मध्ये मतदान प्रक्रीया पुर्ण झाली. मतदानानंतर लगेच निकाल जाहीर करण्यात आला. निवडुन आलेले उमेदवार पुढीलप्रमाणे, चाकण सोसायटी गटातून दौंडकर संभाजी बाळासाहेब , वाफगाव गटातून संतोष अनंता गोरडे, चास सोसायटी गटातून अनिल गणपत टोके, कडूस सोसायटी गटातून दत्तात्रय धोंडिबा शितोळे, म्हाळुंगे सोसायटी गटातून दत्तात्रय रामभाऊ टेमगिरे, व्यक्ती सभासद गटातून ३ जागांसाठी नरेंद्र साहेबराव थिगळे, विनायक शूरसेन घुमटकर,आनंदा मारुती काळे, भटक्या विमुक्त जाती/जमाती गटातून सुधाकर गोविंद मिडगे निवडून आले आहे. बिनविरोध निवडणून आलेले उमेदवार पुढीलप्रमाणे : आळंदी सोसायटी गटातून येळवंडे स्वामी विष्णू यळवंडे, खेड सोसायटी गटातून खंडेराव गुलाबराव थिगळे, वाडा सोसायटी गटातून अरुण बाजीराव सोमवंशी, महिला गटातून प्रतीक्षा संतोष पाचारणे, पूजा तानाजी कचाटे, अनुसूचित जाती/जमाती गटातून कल्याणशील राजाराम देखणे, इतर मागास प्रवर्गातून दत्तात्रय ज्ञानेश्वर सातपुते, बिगरशेती सोसायटी गटातून मुकुंद गजानन धायबर, प्रोसिसिंग व कंजुमर्स संस्था गटातून हिरामण साहेबराव सातकर हे उमेदवार बिनविरोध निवडूण आले असल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी मिलिंद राऊत यांनी दिली.



### डाबर ग्लुकोजने 'एनर्जाइज इंडिया कॅम्पेन' लाँच केले

पुणे (आरंभ पर्व) : डाबरचे इन्स्टंट एनर्जी ड्रिंक असलेल्या डाबर ग्लुकोजने देशभरातील क्रीडा अकादमींमध्ये तरुणांमधील क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि तरुण खेळाडूंमध्ये ऊर्जा आणि तग धरण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी 'एनर्जाइज इंडिया' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत, डाबर ग्लुकोजने लक्ष्मणभाऊ जगताप क्रिकेट अकादमीमध्ये ऊर्जा आणि तग धरण्याची क्षमता व्यवस्थापनावर एक विशेष जागरूकता सत्र आयोजित केले. यावेळी क्रिकेट अकादमीचे मुख्य प्रशिक्षक श्री. मनोज मुळे, फुटबॉल प्रशिक्षक श्री. दिनेश दास, डाबर इंडियाचे श्री. दिनेश कुमार हे देखील उपस्थित होते. सत्रादरम्यान, खेळाडूंना खेळादरम्यान त्यांची कामगिरी कशी सुधारता येईल आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेचा वापर कसा करता येईल हे सांगण्यात आले. डाबरने अकादमीतील अव्वल खेळाडू अर्णव, सार्थक आणि वेद यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला. “युवा खेळाडूंमध्ये ऊर्जा आणि तग धरण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी 'एनर्जाइज इंडिया' मोहीम सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे. ही मोहीम त्यांना त्यांच्या खेळात उर्जेसह सर्वोत्तम कामगिरी करण्यास प्रेरित करेल. डाबर हा खेळाडू, क्रीडा चाहते आणि सक्रिय जीवनशैली जगू इच्छिणाऱ्या लोकांसाठी एक परिपूर्ण ब्रँड आहे. डाबर ग्लुकोज त्वरित ऊर्जा प्रदान करते, म्हणूनच ते विशेषतः शारीरिक हालचाली करणाऱ्या खेळाडूंसाठी चांगले आहे. डाबर इंडिया लिमिटेडच्या हेल्थ सप्लिमेंट्सचे मार्केटिंग प्रमुख श्री. अमित गर्ग म्हणाले. लक्ष्मणभाऊ जगताप क्रिकेट अकादमीचे मुख्य प्रशिक्षक श्री. मनोज मुळे यांनी ऊर्जा सत्रादरम्यान तरुण खेळाडूंना सांगितले की, खेळात चांगल्या कामगिरीसाठी पोषण आणि हायड्रेशन खूप महत्वाचे आहे. या सत्रादरम्यान त्यांना सांगण्यात आले की ते त्यांचा स्टॅमिना आणि सहनशक्ती कशी वाढवू शकतात, जे खेळाडूसाठी खूप महत्वाचे आहे.

# राजगुरुनगर आवारात कांदा लिलाव सुरू

## शेतकऱ्यांनी कांदा विक्रीसाठी आणावा : विजयसिंह शिंदे पाटील

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

किरण खुडे येथील खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजगुरूनगर येथील आवारात प्रथमच कांदा लिलाव सुरू करण्यात आले. कांदा लिलावाचे उद्घघाटन सभापती विजयसिंह शिंदे पाटील, उपसभापती क्रांती सोमवंशी व इतर संचालकांच्या हस्ते करण्यात आले.यामुळे शेतकऱ्यांचे आनंदाचे वातावरण आहे.

खेड तालुक्यात सखल भागात मोठ्या प्रमाणात शेतकरी कांदा पीक घेतात. मात्र गेल्या अनेक वर्ष काही शेतकऱ्यांनी खेड बाजार समितीकडे चाकण आवारात कांदा विक्रीसाठी न आणता मंचर, मुंबई व अन्य ठिकाणी जात होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च व गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. सध्या शेतकऱ्यांच्या शेतात कांदे काढणी चालू असून, या कांद्याला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत होती. त्याला अनुसरून सभापती विजयसिंह शिंदे पाटील व संचालकांनी निर्णय घेऊन राजगुरूनगर येथील मुख्य बाजारात कांदा लिलाव सुरू करण्यात आला. मंगळवार, गुरुवार, रविवार या दिवशी कांदा, बटाटा, लसूण, भुईमूग शेंग या शेतमालाचे उघड पद्धतीने लिलाव विक्री होणार आहे. लिलाव झाल्यानंतर मालविक्रीचे पैसे तात्काळ शेतकरीपट्टी प्रमाणे शेतकऱ्यांना मिळणार आहे. तसेच तसेच चाकण प्रमाणे राजगुरुनगर आवारात शेतकऱ्यांना अल्पदरात लवकरच भोजनाची व्यवस्था केली जाणार असल्याचेही यावेळी सभापती शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, यावेळी तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. शेतकऱ्यांनी राजगुरुनगर आवारात कांदा विक्रीसाठी आणावा असे आवाहन समितीच्या वतीने उपसभापती क्रांती सोमवंशी यांनी केले, तर लिलावानंतर त्याच दिवशी शेतकऱ्यांना पट्टी दिली जाईल, त्याच बरोबर सर्व व्यवहार पारदर्शकपणे केले जातील, असल्याचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी सांगितले. यावेळी संचालक अशोक राक्षे, अनुराग जैद, माणिक गोरे, सागर मृन्हे, सोमनाथ मुंगसे, सचिव बाळासाहेब धंद्रे यांच्यासह व्यापारी व शेतकरी उपस्थित होते.



आपल्या वार्षिक "कस्टमर डे" उत्सवाचा एक भाग म्हणून, एअरटेल ROM च्या 7,100+ कर्मचाऱ्यांनी बुधवारी पूर्ण दिवस फिल्डमध्ये घालवला आणि ग्राहक, किरकोळ विक्रेते आणि इतर भागधारकांकडून थेट अभिप्राय गोळा केला. दरवर्षी या दिवशी, सर्व एअरटेल कर्मचारी आपल्या कार्यालयांच्या बाहेर पडून देशभरातील ग्राहकांशी थेट संवाद साधतात, ज्यामुळे उत्कृष्ट सेवा आणि ग्राहक संतोष याबद्दल कंपनीची वचनबद्धता अधिक दृढ होते.

## ‘पीएमआरडी’च्या जागेत छत्रपती संभाजी महाराजांचा शंभर फूट उंच पुतळा

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

मोशीतील बोऱ्हाडेवाडी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या (पीआयईसीसी) जागेत छत्रपती संभाजी महाराज यांचा शंभर फूट उंच पुतळा उभारण्यात येणार आहे. पुतळ्याची जागा बदलण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेत मान्यता दिली. महापालिकेच्या वतीने बोऱ्हाडेवाडी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा शंभर फूट उंचीचा पुतळा उभारण्यात येणार होता. पुतळ्यासाठी चौथरा उभारण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, ती जागा योग्य नसल्याने दर्शनी भागात पुतळा उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. आता हा पुतळा पीएमआरडीएच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या जागेत उभारला जाणार आहे. पीएमआरडीएने मोशीतील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रातील अडीच एकर जागा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ताब्यात दिली आहे. या जागेत पुतळा उभारण्याचे काम धनेश्वर कन्स्ट्रक्शनला देण्यात आले आहे. या ठेकेदाराने पुतळ्याचे काम शिल्पकार राम सुतार यांना दिले आहे. दिल्लीत पुतळा तयार करण्याचे काम सुरू आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) यांच्या मंजूर संरचनेनुसार हे काम केले जात आहे. महापुरुषांचा पुतळा उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या नव्या जागेत हा पुतळा उभारण्याचा ‘क’ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या प्रस्तावाला आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांनी सर्वसाधारण सभेत मान्यता दिली आहे.

## ७२ वर्षाच्या महिला रूग्णावर पॅनक्रिऍटिको स्प्लेनेक्टोमी प्रक्रिया

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटरच्या डॉक्टरांच्या टीमने स्वादुपिंडामध्ये गाठ असलेल्या येमेन येथील 72 वर्षीय महिला रूग्णावर यशस्वीरित्या रोबोटिक रॅडिकल डिस्टल पॅनक्रिऍटिको स्प्लेनेक्टोमी प्रक्रिया केली. भारतीय बनावटीच्या आधुनिक सर्जिकल रोबोटच्या माध्यमातून अशा प्रकारची केलेली ही महाराष्ट्रातील पहिली आणि भारतातील दुसरी प्रक्रिया आहे.

याबाबत माहिती देताना नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटर येथील वरिष्ठ कर्करोग तज्ञ डॉ.ललित बन्सवल म्हणाले की,येमेन येथील या 72 वर्षीय महिला जेव्हा आमच्या रूग्णालयात आल्या होत्या,तेव्हा त्यांना पोटात तीव्र वेदना होत होत्या. येमेन मध्ये त्यांनी सोनोग्राफी केली होती आणि स्वादुपिंडामध्ये गाठ असल्याचे निदान झाले होते. त्यांनी भारतात येण्याचा निर्णय घेईस्तोवर गाठीचा आकार १०x६ सेमी एवढा मोठा झाला होता.

ते पुढे म्हणाले की,पेटस्कॅन द्वारे ही गाठ स्वादुपिंडामध्ये मर्यादित होती आणि त्यामुळे शस्त्रक्रिया शक्य होती याचे निदान झाले.त्यांच्या वयाच्या बाबीशिवाय त्यांचे वजन हे 140 किलो होते आणि बीएमआय हा 38 होता. त्याशिवाय त्यांना अनियंत्रित रक्तदाब व मधुमेहासारख्या अनेक सहव्याधी होत्या. काही वेळा खुली शस्त्रक्रिया हा पर्याय असतो,मात्र रूग्णामधील गुंतागुंत लक्षात घेता आम्ही लॅप्रोस्कोपी किंवा रोबोटिक शस्त्रक्रियेसारख्या कमीत कमी छेद असणाऱ्या प्रक्रियेचा सल्ला दिला.

त्यांना असलेल्या सहव्याधी,वजन आणि ट्युमरचे ठिकाण यामुळे ही शस्त्रक्रिया गुंतागुंतीची होती.या शस्त्रक्रियेला साधारण तीन तास लागले. स्वादुपिंडाच्या आजूबाजूला असलेल्या मुख्य रक्तवाहिन्यांना शस्त्रक्रियेदरम्यान बाजूला करणे गरजेचे होते. पॅनक्रिऍटिको स्प्लेनेक्टोमी ज्याला डिस्टल पॅनक्रिऍटेक्टोमी विथ स्प्लेनेक्टोमी असे म्हणतात.या प्रक्रियेमध्ये स्वादुपिंडाचा मुख्य भाग आणि अरुंद टोक (टेल) आणि कधीकधी स्प्लिहा काढण्याची शस्त्रक्रिया असते. ही प्रक्रिया स्वादुपिंडामध्ये ट्युमर/कर्करोग,क्रॉनिक पॅनक्रिऍटिटिस आणि इतर परिस्थितीमध्ये केली जाते.याबाबत स्प्लिहाला जाणाऱ्या वाहिनीचे गाठीने नुकसान झाल्यामुळे काढून टाकावी लागली.

**डॉ.ललित बन्सवल पुढे म्हणाले की, रोबोटिक प्रणालीमुळे ही प्रक्रिया अचूकतेने करता आली.कमी रक्तस्त्राव आणि बाधित जागेच्या आजूबाजूला असलेल्या पेशींना कमीत कमी नुकसानामुळे रूग्णाला लवकर बरे होता येते.या रूग्णाला दोन दिवसातच आयसीयूमधून सामान्य रूम मध्ये आणण्यात आले आणि चालण्यास सांगितले गेले. ते म्हणाले की हिस्टोपॅथॉलाजी रिपोर्ट मध्ये ही गाठ कर्करोगाची नसल्याचे निदान झाले (बिनाईन ट्युमर) त्यामुळे इतर कुठलीही सहाय्यक उपचाराची गरज भासली नाही.**

## सर्वात मोठ्या संत तुकाराम महाराज यांच्या पगडीचे अनावरण

- **जगद्गुरु संत तुकाराम महाराज्यांच्या पगडीची वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया अँन्ड जिनिअसमध्ये नोंद**
- **संत तुकोबांच्या जगातील सर्वात मोठ्या पगडीची विश्वविक्रमात नोंद**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संत तुकाराम महाराज बीजच्या निमित्ताने जगातील सर्वात मोठ्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पगडीचा लोकार्पण सोहळा जगद्गुरु संत तुकाराम महाराज मुख्य मंदिर, श्रीक्षेत्र देहू या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी संत तुकाराम महाराज देवस्थान ट्रस्ट - श्रीक्षेत्र देहूचे अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिलीप सोनिगरा ज्वेलर्स यांना वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया अँन्ड जिनिअस फाऊंडेशनचे सी.ई.ओ पवनकुमार सोलंकी यांनी विश्वविक्रम केल्याचे प्रमाणपत्र दिले. या प्रसंगी दिलीप सोनिगरा ज्वेलर्सचा संपूर्ण परिवार तसेच मुकुंदनाना राऊत (महाराज), शंकर मराठे(महाराज), रविंद्र ढोरे (महाराज), नितिन काकडे (महाराज) उपस्थित होते. त्याच बरोबर आध्यात्मिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली होती.

दिलीप सोनिगरा म्हणाले की जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पावन झालेल्या नगरीमध्ये आम्ही वास्तव करत असून याच परिसरात आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून व्यवसायात स्थिर झालो आहे. तुकाराम महाराजांवर आमची नितांत श्रद्धा, प्रेम आणि स्नेह आहे. याच सदभावनेतून आम्ही जगातील सर्वात मोठी पगडी तयार केली असून वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया अँन्ड जिनिअस बुकमध्ये हिची नोंद झाली. सदरील पगडीचा घेराव हा २२ फुटांचा असून पगडीची उंची ४ फूट आहे. तर पगडीला ५०० मीटर लांबीचा कपडा लागला आहे.

## पिंपरी कॅम्पमधील बाजारपेठ लवकरच कायमस्वरूपी वाहनमुक्त


**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**



शहरातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या पिंपरी कॅम्पमधील वाहनमुक्त उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामुळे नवीन ग्राहकांमध्ये २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. बाजारपेठेतील रस्ता कायमस्वरूपी पादचारी मार्ग करण्याची व्यापाऱ्यांची मागणी आहे. त्यानुसार पिंपरी बाजारपेठ वाहनमुक्त करणार असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. शहरातील सर्वात गजबजलेल्या आणि वर्दळ असलेल्या पिंपरी बाजारपेठेत वाहनमुक्त दिनाचे आयोजन करण्यात आले होते. येथील संपूर्ण रस्ते दोन दिवस सकाळी आठ ते रात्री नऊ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले होते. या उपक्रमानंतर आयुक्तांनी व्यापाऱ्यांसोबत चर्चा केली. वाहतूक पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील, माजी नगरसेवक डब्बू आसवानी, दुकानदार संघटनेचे प्रतिनिधी नीरज चावला, पुरुषोत्तम बोधवानी, शहरविकास तज्ज्ञ प्रसन्न देसाई, आशिक जैन यांच्यासह स्थानिक दुकानदार उपस्थित होते.

# मिशन आर्थ्रायटिस इंडिया’ (माई) तर्फे ‘राष्ट्रीय रुग्ण परिषदेचे’ आयोजन!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




मिशन आर्थ्रायटिस इंडिया (माई ) तर्फे राष्ट्रीय रुग्ण परिषद, रविवार, दिनांक २३ मार्च २०२५ रोजी हॉटेल रामी ग्रँड, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. हा कार्यक्रम सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पार पडेल. त्यानंतर मनोरंजन आणि भोजनाचा कार्यक्रम होईल. या परिषदेत १०० हून अधिक रुग्ण आणि १५ ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट एकत्र येऊन ऱ्हुमॅटॉइड आर्थ्रायटिसच्या विविध पैलूंबाबत चर्चा करतील.‘मिशन आर्थ्रायटिस इंडिया’ (माई) ही एक नोंदणीकृत चॅरिटेबल ट्रस्ट संस्था आहे. २००० साली स्थापन झालेल्या या संस्थेचे आर्थ्रायटिस आणि ऱ्हुमॅटिझम रुग्णांसाठी एक स्वयंसेवी आधार आणि समर्थन गट म्हणून कार्य सुरू आहे. श्रीमती शरयू भट यांच्या संकल्पनेतून उभ्या राहिलेल्या या उपक्रमाला डॉ.अरविंद चोप्रा, श्रीमती दीपा मेहता, श्रीमती शिवानी बर्वे आणि अनेक रुग्णांचा पाठिंबा लाभला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. चंद्रशेखर एस, अध्यक्ष - इंडियन ऱ्हुमॅटॉलॉजी असोसिएशन (IRA) उपस्थित राहतील, तर श्रीमती मनीषा सांगवी या सन्माननीय अतिथी असतील. याशिवाय लुपस (केरळ), अँकिलोझिंग स्पॉंडिलायटिस (मुंबई), स्क्लेरोडर्मा (दिल्ली), आणि शोग्रेन सिंड्रोम (अहमदाबाद) या स्व-प्रतिकारक (Autoimmune) आजारांच्या आधार आणि समर्थन गटांचे नेते देखील या परिषदेत सहभागी होतील. दीपा मेहता, - ’माई’अध्यक्ष - म्हणाल्या , “या वर्षी आम्ही ‘माई’चे रौप्यमहोत्सवी वर्ष (सिल्वर ज्युबिली) साजरे करत आहोत, त्यामुळे ही परिषद आमच्यासाठी विशेष महत्त्वाची आहे. ही परिषद रुग्णांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे, जिथे नामवंत डॉक्टरांकडून आर्थ्रायटिस बद्दल सखोल माहिती मिळू शकते. तसेच, हा गट भावनिक आधार, समंजस वातावरण आणि परस्पर अनुभव शेअर करण्यासाठी एक सुरक्षित जागा उपलब्ध करून देतो. त्यामुळे रुग्णांना आपली एकटेपणाची भावना कमी होण्यास मदत होते आणि ते अधिक आत्मविश्वासाने निर्णय घेऊ शकतात.”

सेंटर फॉर ऱ्हुमॅटिक डिसीजेस,पुणे चे संचालक व मुख्य ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट डॉ अरविंद चोप्रा म्हणाले की सांधे आणि हाडांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी डॉक्टर्स आणि रुग्णामध्ये एक पूल बांधण्याची गरज होती. त्यामुळेच माई सारखी संस्था उदयास आली. जागरूकता, ज्ञान आणि सक्षमीकरण हे माई च्या कार्याचे मुख्य स्तंभ आहेत. डॉ. पराग संचेती, अध्यक्ष - संचेती हॉस्पिटल म्हणाले,“दीर्घकालीन आजारांमुळे भावनिक आणि मानसिक संतुलन बिघडू शकते. आर्थ्रायटिस च्या व्यवस्थापनासाठी एक सर्वसमावेशक दृष्टिकोन आवश्यक आहे. औषधोपचारांसोबत फिजिओथेरपी, व्यायाम, संतुलित आहार आणि मन रमवण्यासाठी एखादा छंद किंवा काम यांचा समावेश करणे गरजेचे आहे. वेदना कमी करण्यासाठी योग्य त्या मदतीचे स्रोत आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन वेळेत मिळणे आवश्यक आहे.

**सेंटर फॉर ऱ्हुमॅटिक डिसीजेस,पुणे चे संचालक व मुख्य ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट डॉ अरविंद चोप्राआणि त्यांच्या सहकाऱ्यांनी WHO COPCORD कार्यक्रमांतर्गत भारतातील विविध भागांमध्ये सर्वेक्षण करून ऱ्हुमॅटिक वेदना आणि आर्थ्रायटिस च्या मोठ्या प्रमाणा वरील समस्या ओळखल्या आहेत. विशेषतः महिलांमध्ये हा आजार अधिक प्रमाणात आढळतो.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.